18 DEC 2025 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संवाद कौशल्याद्वारे करिअरचा मार्ग सोपा

- शिवाजी विद्यापीठात सॉफ्ट स्किल्स, करिअर विकास कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

संवादकौशल्य व सॉफ्ट स्किल्सद्वारे करिअर घडविण्याचा मार्ग सोपा होतो, असा सल्ला शिवाजी विद्यापीठात झालेल्या सॉफ्ट स्किल्स व करिअर विकास विषयक दोन दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शकांनी दिला. अर्थशास्त्र स्वायत्त विभागातर्फे आयोजित दोन दिवसीय कार्यशाळा झाली.

कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थानी मानव्यविद्या शाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. ए. बी. उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक ज्ञानासोबत सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात डॉ. अरविंद जाधव यांनी मार्गदर्शन केले.

## संवादात्मक कार्यशाळा

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी प्रा. ए. एम. गुरव, यांनी 'करिअर यशासाठी व्यावसायिकता" या विषयावर व्यावसायिक शिस्त, कार्यनिष्ठा, वेळेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण आत्मविकासासंबंधी मार्गदर्शन केले. इरशाद वडगावकर यांनी 'परदेशी भाषा : संवादातील एक नवी दिशा" या विषयावर मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यशाळा अत्यंत माहितीपूर्ण व संवादात्मक ठरली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून व्यावहारिक कौशल्यांचा लाभ घेतला. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. दिग्विजय पाटील यांनी दोन दिवसीय कार्यशाळेचा आढावा घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2025
जनप्रवास

# करिअर विकासावर कार्यशाळा उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**


कौशल्य व सॉफ्ट स्किल्सद्वारे करिअर घडविण्याचा मार्ग या विषयावर अर्थशास्त्र विभाग (स्वायत्त), शिवाजी विद्यापीठ येथे सॉफ्ट स्किल्स व करिअर विकास विषयक दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली. डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. ए. बी. साळी यांनी मार्गदर्शन लाभले.

डॉ. अरविंद जाधव, प्राध्यापक, इंग्रजी विभाग, यशवंतराव चव्हाण विज्ञान महाविद्यालय यांनी "स्व-जागरूकता निर्माण करणे आणि मूलभूत संवादकौशल्यांमध्ये प्रावीण्य मिळवणे" या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. मानसिंग ठोंबरे यांनी "सहकार्य, संघकार्य आणि वाटाघाटी" या विषयावर मार्गदर्शन केले. संघकार्य, नेतृत्वगुण, संघर्ष निवारण व वाटाघाटी कौशल्ये यांचे व्यावहारिक महत्त्व सांगितले. डॉ. ए. एम. गुरव यांनी "करिअर यशासाठी व्यावसायिकता" या विषयावर मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2025
तरुण भारत

# डॉ. राजेश पाटील यांना करंदीकर संशोधन पुरस्कार जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मराठी विषयातील सर्वोत्कृष्ट संशोधन प्रबंधाला देण्यात येणारे डॉ. व्ही. आर. करंदीकर संशोधन पारितोषिक डॉ. राजेश पाटील (सोन्याची शिरोली) यांना जाहीर



झाला आहे. डॉ. करंदीकर सत्कार समिती, पुणे यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून हे पारितोषिक दिले जाणार आहे. सन २०२३ ते २५ कालावधीत सर्वोत्कृष्ट प्रबंध म्हणून विद्यापीठाने त्यांच्या प्रबंधाला हे पारितोषिक जाहीर केले आहे. डॉ. पाटील यांना 'कृष्णराव अर्जुन केळूसकर : व्यक्ती आणि वाङमय' या विषयावरील प्रबंधास शिवाजी विद्यापीठाने पीएच. डी पदवी प्रदान केली आहे. प्रा. डॉ. राजन गवस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन कार्य पूर्ण केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. रणधीर शिंदे, प्रा. नंदकुमार मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2025
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेतील १६९ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील बुधवारी या ९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आले असून आजअखेर १६९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. बुधवारी विविध ६८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने झाल्या. जिल्ह्यातील विविध १६६ परीक्षा केंद्रावर परीक्षा पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी १० हजार ९१५ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेतील गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून बुधवारी कोल्हापूर २, सांगली ४ व सातारा ३ अशा एकूण ९ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठाचे १६९ निकाल जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. दरम्यान, बुधवारी ९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, तर आजअखेर १६९ अभ्यासक्रमांचे निकाल लावण्यात विद्यापीठाच्या परीक्षा विभागाला यश आले आहे.

दिवसभरात ६८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १६६ परीक्षा केंद्रांवर झाल्या. या परीक्षांसाठी १० हजार ९१५ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेतील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यात २, सांगली जिल्ह्यात ४ आणि सातारा जिल्ह्यात ३ अशा एकूण ९ गैरप्रकारांची नोंद केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2025
पुढारी

संक्षिप्त

# शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये कार्यशाळेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत स्टेम अध्यापनशास्त्र 'इनोव्हेटिव स्टेम पेडागॉजी : ब्रीजिंग थिअरी अँड प्रॅक्टिस' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे होत्या. याप्रसंगी आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. अजय साळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना म्हणाले, स्टेम अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांसाठी गरजेची बाब आहे. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. एन. डी. देशमुख, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, ममता घोटल, अतुल जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2025

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात आज पर्यावरण शिक्षकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि पर्यावरण संरक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने १८ रोजी महाविद्यालयातील पर्यावरण विषयाच्या अध्यापकांसाठी पर्यावरण जाणीव-जागृती एकदिवसीय कार्यशाळा आहे. गणित अधिविभागाच्या सभागृहात सकाळी ११ ते ५ या वेळेत ती होईल. कार्यशाळेला कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2025
सकाळ

# जाणीवजागृती कार्यशाळा आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग व पर्यावरण संरक्षण समितीतर्फे गुरुवारी (ता. १८) महाविद्यालयातील पर्यावरण विषयाच्या शिक्षकांसाठी पर्यावरण जाणीव-जागृती एकदिवसीय कार्यशाळा होत आहे. गणित अधिविभागाच्या सभागृहात सकाळी ११ ते ५ या वेळेत कार्यशाळा होईल. डॉ. मनोज पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. श्रुती कुलकर्णी, डॉ. आसावरी जाधव मार्गदर्शन करणार आहेत.